International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# भारतीय लोकशाही समोरील आव्हाने

**डॉ. अर्जुन येरगे**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख, संशोधन मार्गदर्शक,*
*श्री संपतराव माने महाविद्यालय, खानापूर*
***Corresponding Author* - डॉ. अर्जुन येरगे**
**DOI - 10.5281/zenodo.10940983**

**गोषवारा:**

*लोकशाही ही आदर्श शासन व्यवस्था म्हणून जगात ओळखली जाते. परंतु कुठलीही शासन व्यवस्था संपूर्णपणे दोषरहित नसते. त्याच प्रमाणे लोकशाही शासन व्यवस्था कितीही चांगली असली तरी तिला अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो . म्हणूनच चेस्टरटन हा विचारवंत म्हणतो की, 'लोकशाही हा धोक्याचा व्यापार आहे' परंतु या मताचे खंडन करण्यासाठी विन्स्टंट चर्चिल यांचे एक विधान महत्वाचे आहे . विन्स्टन चर्चिल यांच्या मते 'लोकशाही हे संकट आहे, पण त्यातल्या त्यात इतर शासन व्यवस्थेपेक्षा ती कमी उपद्रव्यकारक संकट आहे'.लोकशाहीला संपुष्टात आणण्यासाठीची आव्हाने लोकशाही अंतर्गत राज्यातच निर्माण होतात हे जरी सत्य असले तरी लोकशाही ही आपल्या अंगभूत गुणांमुळे या आव्हानावर मात करू शकते हे सत्य ही नाकारता येत नाही. जगात सगळ्यात मोठा लोकशाही शासन असणारा देश म्हणून भारताकडे पहिले जाते. जगातील इतर बऱ्याच देशांनी लोकशाही शासन व्यवस्था स्वीकारली परंतु ती व्यवस्था त्यांना टिकवता आलेली नाही . इंग्लंड या देशाला संसदीय लोकशाहीची जननी म्हटले जात असले तरी तिथे सामाजिक व सांस्कृतिक भिन्नता तेवढी नाही जेवढी भारतामध्ये आहे .त्यामुळे या विविधतेमध्ये एकाता प्रस्थापित करण्यात भारतीय लोकशाही यशस्वी झालेली आहे . अर्थात: भारतीय लोकशाही व्यवस्थे समोर कोणतीच आव्हाने नव्हती किंवा नाहीत असा त्याचा अर्थ होत नाही. स्वतंत्र्य प्राप्तीपासून आज पर्यंत भारतीय लोकशाही समोर अनेक आव्हाने होती आणि आजही आहेत. त्या आव्हानाचा सामना यशस्वीपणे करून आपण आपली लोकशाही जिवंत ठेवली आहे . वर्तमानात सुद्धा भारतीय लोकशाहीवर अनेक बाजूनी हल्ला होत आहे . भारतीय लोकशाहीवर होणारा हल्ला व आव्हाने परतून लावण्याचे जबाबदारी प्रत्येक भारतीयांची आहे .*

***Key Words** – लोकशाही , निवडणुका , सुशासन , जात , धर्म , विचारसरणी*

**प्रस्तावना:**

भारतात लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे . लोकशाही शासन व्यवस्थेत राज्याची सत्ता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या जनतेच्या हातात असते . जनता ही सार्वभौम असते . भारतात प्रातिनिधिक व संसदीय लोकशाहीचा स्वीकार करण्यात आला आहे .यामध्ये जनता निवडणुकीच्या माध्यमातून आपले प्रतीनिधि निवडत असते . भारतामध्ये 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येक स्त्री व पुरुषास मतदानाचा अधिकार दिला जातो. जात ,लिंग, धर्म, वंश, वर्ण, भाषा, जन्मस्थळ, संपत्ती, शिक्षण इत्यादी कोणताही भेदभाव न करता नागरिकास मताधिकार दिला जातो. निवडलेले प्रतिनिधी हे जनतेतर्फे राज्याचे नेतृत्व करतात.

भारतीय लोकशाही व्यवस्था स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यवस्थेवर आधारलेली आहे. प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मूलभूत स्वातंत्र्याची हमी भारतीय लोकशाही देते. भारतीय लोकशाही ही बहुमतावर आधारलेली लोकशाही आहे . सत्तेच्या केंद्रीकरणामुळे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात समान संधी मिळत नाही म्हणून भारतीय शासन व्यवस्थेत केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक सरकार अशा प्रकारे सत्तेचे विकेंद्रीकरण केले आहे. भारतीय लोकशाहीत संविधानाद्वारे कायद्याचे राज्य प्रस्थापित केले आहे. ज्याचा अर्थ कायद्यासमोर भारतातील सर्व नागरिक समान असतील. भारतीय लोकशाहीत व्यक्ती पूजा किंवा विभूती पूजा अमान्य केलेली आहे. विभूती पूजा म्हणजे एखाद्या व्यक्तीचा उदो उदो करून त्या व्यक्तीचे महत्त्व वाढविणे होय परंतु अशा विचाराला लोकशाहीत स्थान नसते. लोकशाही शासनाचा उद्देश लोक कल्याण करणे हाच असतो. लोकांचा सर्वांगीण विकास कसा करता येईल या दृष्टीने शासन कारभार करण्यात येतो. भारतीय लोकशाही शासन कारभाराची मूलतत्त्वे लिखित स्वरूपात राज्यघटनेत स्पष्ट केलेली आहेत.तसेच जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या मुलभूत हक्काचा समवेश राज्यघटनेत केलेला आहे. भारतीय लोकशाही शांततामय व संविधानिक मार्गाने सत्ता परिवर्तनावर विश्वास ठेवते.

वरीलप्रमाणे एक आदर्श लोकशाही व्यवस्था आपल्या देशात आहे .परंतु आज जातीय राजकारण, धार्मिक राजकारण, भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, संविधानिक संस्थांचा गैरवापर, नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य वरील बंधने, प्रसारमाध्यमांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य वरील बंधने,न्यायालयीन स्वातंत्र्याची गळचेपी. पक्षपाती निवडणुका, मतदार जागृतीचा अभाव, बहुमताची झुंडशाही, पाशवी बहुमताच्या आधारे संविधानात हस्तक्षेप, राजकीय विचारसरणीचा अभाव, निवडणूक रोखे, बहुमतावर आधारित अल्पमतीय प्रतिनिधित्व, राजकीय नेत्यांचे संमोहन, इत्यादी घटकांनी भारतीय लोकशाही समोर आव्हान उभे केले आहे .

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये:**

1. लोकशाही शासन व्यवस्थेचा अभ्यास करणे .
2. भारतीय लोकशाहीतील आदर्श तत्वांचा अभ्यास करणे .
3. भारतीय लोकशाही समोरील आव्हानांचा अभ्यास करणे .

**शोध निबंधाची गृहीतके:**

1. लोकशाही हा शासन व्यवस्थेचा एक आदर्श शासन प्रकार आहे .
2. भारतीय लोकशाहीत स्वातंत्र्य ,समता , न्याय या आदर्श तत्वांचा समावेश , बंधुता . केलेला आहे
3. भारतीय लोकशाही समोर जातीय राजकारण ,भ्रष्टाचार ,धार्मिक राजकारण , इत्यादी ,राजकारणाचे गुन्हेगारीकरण . आव्हाने आहेत

**संशोधन पद्धती:**

वरील शोध निबंधाच्या संशोधनासाठी ऐतिहासिक , विश्लेषणात्मक ,तुलनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे .

**भारतीय लोकशाही समोरील आव्हाने:**

**जातीचे राजकारण :**

भारतीय लोकशाही पुढे जातीचे राजकारण हे एक आव्हान आहे . भारतात विविध राजकीय पक्ष वेगवेगळ्या जाती समूहांच्या हिताचे प्रतिनिधित्व करतात. जातिव्यवस्थेचा लोकांच्या राजकीय सत्तेवर लक्षणीय प्रभाव आहे. विशेषाधिकार प्राप्त उच्चवर्णीय गटांना अधिक आर्थिक आणि राजकीय सत्ता मिळवून अधिक फायदा होतो, तर खालच्या जातीच्या गटांना त्या अधिकारांपर्यंत मर्यादित प्रवेश असतो. अशा परिस्थितीत खालच्या जातीचे लोक एकत्र येऊन आपला गट वा संघटना किंवा जातीवर आधारित राजकीय पक्ष स्थापन करून आपले हितसंबंध जोपासत असतात . तसेच प्रस्थापित राजकीय पक्ष निवडणुकांमध्ये जातीचा आधार घेत असतात . अशाप्रकारे जातीचे राजकारण लोकशाहीला घातक आहे.

**धर्माचे राजकारण:**

प्राचीन काळापासूनच धर्म आणि राजकारणात समन्वय होता. परंतु भारताच्या वर्तमान परिस्थितीत धर्म आणि राजकारण दोघेही स्वार्थासाठी एकमेकाचा वापर करीत आहेत .धर्म हा धर्म राहिला नसून तो दांभिक धर्म झालेला आहे . अलीकडे प्रत्येक धर्माचे लोक धार्मिक कट्टरतेची शिकवण देत आहेत ,हे लोकशाहीमध्ये घातक आहे . लोकशाहीमध्ये धर्माची आवश्यकता लोकांना नैतिक आणि सदाचरणी बनवण्यासाठी आहे. राजकारणाचे कार्य लोकांची आणि त्यांच्या कल्याणाची काळजी करणे हे आहे. याचा अर्थ धर्म आणि राजकारण पूर्णपणे भिन्न व तटस्थ राहावेत असे नाही .कारण धर्म लोकांना नैतिकता ,सदाचरण शिकविते या अर्थाने राजकारणातील लोकांना

सदाचरण शिकविण्यासाठी धर्म आवश्यक आहे . जेव्हा राजकारण आणि धर्म एकत्र नांदत नाहीत, तेव्हा तुम्हाला भ्रष्ट राजकारणी आणि दांभिक धर्मनेते यांचा सुळसुळाट झाल्याचे आढळेल. जी धार्मिक व्यक्ती प्रामाणिक, प्रेमळ आणि सदाचरणी आहे, ती सर्व जनसामान्यांच्या कल्याणाची धूरा बाळगेल आणि त्यामुळे एक चांगली राजकारणी बनू शकेल. एक चांगला राजकारणी प्रेमळ आणि सदाचरणी असावाच लागतो.धर्म आणि राजकारण सामाजिक जीवनाचे अनिवार्य घटक आहेत. ते एकमेकांना पूरक आहेत. धर्माच्या अभावी राजकारण विवेकशून्य होते. तर राजकारणाशिवाय धर्माचा विकास होत नाही. म्हणून धर्म आणि राजकारण या दोघांनी स्वताच्या स्वर्थासाठी एकमेकाचा वापर न करता जनकल्याणासाठी कार्य केले पाहिजे .

**भ्रष्टाचार:**

भ्रष्टाचार भारतीय लोकशाहीला लागलेली एक कीड आहे .सार्वजनिक क्षेत्रामध्ये भ्रष्टाचाराचे सर्वेक्षण करणारी ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलने करप्शन परसेप्शन इंडेक्स (CPI) 2023 जारी केलेल्या अहवालानुसार १८० देशांच्या यादीत भारताचा ९३ वा क्रमांक आहे तर भ्रष्टाचार धारणा निर्देशांक 40 इंडेक्स पॉइंट आहे .भारतात भ्रष्टाचारामध्ये राजकीय नेत्यांचा पहिला नंबर लागतो तर दुसरा नंबर प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी वर्गाचा लागतो. ज्या लोकांना आपण आपल्या जीवन व वित्ताच्या रक्षणाची जबाबदारी दिली त्या लोकांकडूनच मोठ्या प्रमाणात आपल्या वित्ताचे भक्षण केले जात आहे . भ्रष्टाचार निर्मुलनासाठी अनेक संवैधानिक संस्थांची निर्मिती करण्यात आलेली आहे . त्यामध्ये नियंत्रक व महालेखापरीक्षक, E.D, Income Tax, CBI, ACB, लोकायुक्त इत्यादी होत. परंतु स्वतंत्र्य प्राप्तीपासून आज पर्यंत कुठल्याही शासकीय यंत्रणेला भारतातील भ्रष्टाचार संपवता आलेला नाही . म्हणून आता भ्रष्टाचार संपविण्यासाठी जनतेनेच पुढाकार घेतला पाहिजे. त्यासाठी जे भ्रष्ट नेते आहेत त्यांना निवडणुकीमध्ये मतदानाच्या माध्यमातून जागा दाखवली पाहिजे . तसेच भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचारी यांचा कायदेशीर मार्गाने भ्रष्टाचार बाहेर काढून त्यांची संपत्ती जप्त करून त्यांना पदमुक्त केले पाहिजे.

**जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधने:**

लोकशाहीमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्याला खूप महत्त्व असते. भारतीय संविधानाच्या कलम 19 मध्ये भारतीय जनतेला अभिव्यक्ती स्वातंत्र्याची हमी देलेली आहे. त्यामध्ये सरकारवर टीका करण्याचे स्वातंत्र्य सुद्धा समाविष्ट आहे. जर कुठलेही शासन हे जनतेचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या हिरावून घेत असेल तर ते लोकशाहीसाठी खूप घातक ठरते. ब्रिटिश काळामध्ये ब्रिटिश सरकार विरुद्ध बोलणाऱ्या लोकांना जेलमध्ये टाकले जात होते. त्याविरुध्द भारतीयांनी आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठी, आपले स्वराज्य परत

मिळवण्यासाठी अनेकांनी प्राणांची आहुती दिली आणि भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. 1975 मध्ये आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालून हुकूमशाही पद्धतीने शासन केले. त्याविरुद्ध जनतेने निवडणुकीच्या माध्यमातून त्यांच्या हुकूमशाही शासनाचा पराभव केला. तशीच काहींशी परिस्थिती सद्यस्थितीत भारतीय शासन व्यवस्थेत निर्माण झाले आहे. भारतीय लोकशाहीला हे मारक आहे. म्हणून कुठलेही शासन जे जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घालण्याचा प्रयत्न करेल त्या शासनास सत्तेपासून दूर केले पाहिजे.

**प्रसार माध्यमांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधने:**

प्रसार माध्यमे ही लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ समजला जातो. जनतेच्या इच्छा आकांक्षांचे प्रतिनिधित्व प्रसारमाध्यमे करीत असतात. प्रसारमाध्यमे ही जनता आणि सरकार यांच्यामध्ये दुवा म्हणून कार्य करीत असतात. जनतेचे प्रश्न ,समस्या सरकारपर्यंत पोहोचविण्याचे ते काम करतात. निष्पक्ष प्रसार माध्यमे लोकशाहीच्या जिवंतपणाचे लक्षण असते. परंतु अलीकडे प्रसारमाध्यमांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने घातली जात आहेत किंवा सरकारद्वारे प्रसारमाध्यमेच विकत घेऊन किंवा दबाव टाकून सरकारविरोधी आवाज दाबला जात आहे. अशी परिस्थिती लोकशाहीला खूप घातक असते. म्हणून मजबूत, मुक्त आणि समृध्द प्रसार माध्यमे, ही स्वतंत्र न्यायालयीन व्यवस्थेइतकीच लोकशाहीची मुळे घट्ट धरून ठेवण्यासाठी आणि घटनेद्वारे मिळालेली कायदेशीर सत्ता मजबूत करण्यासाठी महत्त्वाची आहेत.

**राजकारणाचे गुन्हेगारीकरण:**

जेव्हा गुन्हेगार सरकारच्या राजकारणात भाग घेतात , म्हणजे निवडणुका लढवतात आणि संसदेत आणि राज्य विधानसभेत निवडून येतात त्यास राजकीय गुन्हेगारीकरण म्हणतात . असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (ADR) च्या आकडेवारीनुसार, 2004 पासून भारतीय संसदेत निवडून आलेल्या गुन्हेगारी आरोप असलेल्या उमेदवारांची संख्या वाढत आहे.2004 मध्ये, 24% संसद सदस्यांवर फौजदारी खटले प्रलंबित होते , जे 2019 मध्ये वाढून 43% झाले.फेब्रुवारी 2023 मध्ये दाखल केलेल्या याचिकेत असा दावा करण्यात आला होता की 2009 पासून घोषित गुन्हेगारी खटले असलेल्या खासदारांच्या संख्येत 44% वाढ झाली आहे.2019 च्या लोकसभा निवडणुकीत 159 खासदारांवर बलात्कार, खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण, महिलांवरील गुन्ह्यांसह गंभीर गुन्हे दाखल आहेत.अनेक राजकीय पक्ष स्वतःच्या स्वार्थासाठी, निवडणुकीतील वोट बँक साठी, आर्थिक फायद्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना निवडणुकीचे तिकीट देत असतात.म्हणून सामान्य, हुशार, बुद्धिमान लोक राजकारणात येत नाहीत.त्यामुळे लोकशाहीचे पर्यायाने देशाचे खूप

नुकसान होत आहे. कारण लोकशाहीतील मूलभूत तत्वांची जोपासना, निवडणुकांमधील निष्पक्षता, कायद्याचे पालन आणि जनतेचे उत्तरदायित्व याची हमी गुन्हेगारी नेतृत्व देऊ शकत नाही त्यासाठी जनतेनेच मतदानाच्या माध्यमातून या गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकांना राजकारणापासून दूर ठेवले पाहिजे .

**राजकीय पक्षांतर व आघाडी सरकारे:**

जगातील सर्वच देशातील राजकीय पक्ष हे विशिष्ट विचारसरणीवर आधारित असतात. राजकीय पक्षांची विचारसरणी ही त्यांच्या जाहीरनाम्यातून प्रकट होत असते. भारतातील राजकीय पक्ष सुद्धा विशिष्ट राजकीय विचारसरणीवर आधारित असलेले आहेत . उदा- काँग्रेस धर्मनिरपेक्ष समाजवादी विचारसरणी, भारतीय जनता पार्टी हिंदुत्ववादी विचारसरणी, कम्युनिस्ट पक्ष साम्यवादी विचारसरणी इत्यादी. परंतु सद्यस्थितीत भारतातील राजकीय पक्षांमध्ये राजकीय विचारसरणीचा अभाव दिसून येतो. राजकीय विचारसरणी म्हणजे राजकीय विचारांचा किंवा तत्वांचा समूह असतो. त्या विचारांमध्ये जनतेच्या कल्याणासाठी तडजोड करणे योग्य आहे परंतु स्वताचा स्वार्थ साधण्यासाठी, सत्ता टिकविण्यासाठी तत्वांशी तडजोड करणे राजकीय नैतीकतेमध्ये बसत नाही .पूर्वी राजकीय नेते प्रसंगी सत्ता सोडत पण तत्त्व आणि विचारांना सोडत नव्हते. परंतु आज सत्तेसाठी स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात पक्षांतर होताना दिसून येत आहे. स्वार्थासाठी आपल्या मूळ पक्षाच्या तत्त्वांना ,विचारांना तिलांजली दिली जात आहे. परस्पर विरुद्ध राजकीय विचारसरणी असणारे राजकीय पक्ष सुद्धा सत्तेसाठी स्वार्थासाठी आघाडी करत आहेत.उदा-केंद्रात १९८९ पासून आघाडी शासनास सुरवात झालेली दिसून येते. घटक राज्यामध्ये सुद्धा विरुद्ध विचाराचे पक्ष एकत्र येऊन आघाडी सरकार स्थापन करत आहेत . उदा - जम्मू काश्मीर मधील BJP आणि PDP युती,महाराष्ट्रात BJP आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस युती व शिवसेना ,कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस युती इत्यादी . अशा प्रकारचे आघाडी सरकारे स्थिर नसतात म्हणून ती लोकशाहीला पोषक नसतात. कारण ती आघाडी सरकारे जनहितासाठी एकत्र आलेली नसतात तर स्वताच्या राजकीय फायद्यासाठी , भ्रष्टाचार लापविण्यासाठी एकत्र आलेले असतात .म्हणून जनतेनी जाग्रत होऊन भ्रष्ट आणि स्वार्थी नेत्यांना राजकारणातून दूर केले पाहिजे .

**सदोष निवडणूक प्रक्रिया:**

भारताने लोकशाही शासन व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. लोकशाहीमध्ये निवडणुकीच्या माध्यमातून सत्ता परिवर्तन होत असते. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शक व दोषरहित असणे आवश्यक असते. लोकशाहीमध्ये जनता मतदानाच्या माध्यमातून आपला प्रतिनिधी निवडत असते. भारतामध्ये 18 वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक स्त्री-पुरुषास मतदार म्हणून मतदानाचा हक्क दिला जातो. त्यामुळे ज्यांना राजकीय व्यवस्थेचं कसलंच ज्ञान नसते असेही लोक मतदान करत

असतात. त्यामुळे या निवडणूक प्रक्रियेतून योग्य प्रतिनिधींची निवड होईलच हे सांगता येत नाही. त्यासाठी मतदान जागृती करणं हे सरकारचं कार्य असतं परंतु भारतामध्ये मतदान जागृती जेवढी पाहिजे तेवढी अजून झालेली नाही. म्हणुन ज्या देशांतील जनतेत राजकीय सामाजीकरण जास्त असतं त्या देशाचं सरकार इतर देशापेक्षा चांगला असतं. म्हणून भारतातही राजकीय सामाजीकरण जास्तीत जास्त झालं पाहिजे यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहेत.भारतासारख्या 140 कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये 97 कोटी लोक मतदार आहेत. परंतु प्रत्यक्ष मतदान मात्र 60% च्या वर कधीही जात नाही. याचा अर्थ 40% लोक मतदानात भागच घेत नाहीत. हे सुद्धा लोकशाहीला घातक आहे.

भारतीय निवडणूक प्रक्रियेतील आणखी एक दोष म्हणजे निवडणूक रोखे. निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून कोणताही व्यक्ती कुठल्याही राजकीय पक्षाला देणगी देऊ शकतो. व त्या देणगीचा हिशोब राजकीय पक्षांना देणे बंधनकारक नसते. या प्रक्रियेतून भ्रष्टाचार फोफावण्याची शक्यता असते. म्हणून अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोख्यांचा हिशोब जाहीर करण्याच्या सूचना एसबीआय ला दिलेले आहेत. सार्वत्रिक निवडणुका या निवडणूक आयोगाच्या नियंत्रणाखाली पार पाडल्या जातात परंतु निवडणुकांमध्ये राजकीय पक्ष व उमेदवाराकडून प्रचंड पैसा खर्च केला जातो. यावर पूर्णपणे प्रतिबंध अजून झालेला नाही. लोकशाही ही श्रीमंत लोकांची खर्चिक पद्धती होऊन बसली आहे. त्यामुळे गरीब ,प्रामाणिक, बुद्धिमान लोक राजकारणात येणे दुरापास्त आहे. हे लोकशाहीसाठी घातक आहे.

**न्यायालयीन स्वातंत्र्याची गळचेपी:**

भारतीय लोकशाही शासन व्यवस्था कायदेमंडळ , कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ असे विभाग करून कार्य करीत असते . कायदेमंडळ कायदा करण्याचे , कार्यकारीमंडळ कायद्याची अंमलबजावणी करण्याचे व न्यायमंडळ कायद्याचे अर्थ लावण्याचे कार्य करीत असते . कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्यासाठी , नागरिकांच्या मुलभूत अधिकारांचे प्रभावीपणे रक्षण करण्यासाठी, लोकशाहीमध्ये अभिप्रेत असलेल्या संवैधानिक संस्थांच्या अधिकारांमध्ये संतुलन टिकविण्यासाठी, न्यायिक कार्यवाही निष्पक्षपणे चालविण्यासाठी तसेच लोकशाही कार्यपद्धतीशी संबंधित अशा सर्व व्यवहारांचे यथायोग्य नियंत्रण व्हावे यासाठी न्यायालयांचे स्वातंत्र्य महत्वाचे मानले जाते. परंतु भारतात न्यायालयातील न्यायाधीशांची नियुक्ती कार्यकारीमंडळाकडून म्हणजेच सरकारकडून होत असते . त्यामुळे न्यायालयीन कार्यामध्ये सरकारचा हस्तक्षेप होऊन न्यायालयीन स्वतंत्र्याची गळचेपी केली जात आहे . निष्पक्ष न्यायदान हा जो लोकशाहीचा आत्मा आहे त्याला तडे जात आहेत . त्यामुळे भारतीय लोकशाही वाचवण्यासाठी न्यायालयांचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणे आवश्यक आहे .

**सारांश:**

वरील प्रमाणे आज भारतीय लोकशाही समोर अनेक आव्हाने आहेत .लोकशाही समोरील आव्हानांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, भारतीय लोकशाहीला संपुष्टात आणण्यासाठीची आव्हाने आपल्या देशांतर्गतच आहेत . लोकशाही वर हल्ला एक तर सरकार द्वारे होत आहे किंवा दुसरे जनतेद्वारे होत आहे . हा लोकशाही वरील हल्ला परतून लावण्याचा उपाय म्हणजे लोकशाहीला मारक असणाऱ्या सरकारला जनतेनी मतदानाच्या माद्यमातून दूर ठेऊन निष्पक्ष , निस्वार्थ , बुद्धिमान व हुशार लोकांना निवडून देणे . तसेच जनतेद्वारे किंवा जनतेच्या समूहाद्वारे लोकशाही व्यवस्थेत बाधा येत असेल तर सरकारने कायद्याचा आधार घेऊन अशा लोकांवर कार्यवाही करणे .अशा प्रकारे भारतीय लोकशाहीला जिवंत ठेवण्याची, त्याच्यासमोरील आव्हानांचा सामना करण्याची जबाबदारी शासन व जनता दोघांचीही आहे .

**संदर्भ:**


1. हर्बट ऑगर (पन्नालाल सुराणा -अनु) प्रज्ञ पाठशाला मंडळ , लोकशाहीचे धोके १९६७ वाई ,
2. सुभाष कश्यप , आपल संविधान – ॅनशनल बुक ट्रस्ट नई दिल्ली
3. देशमुख अलका भारतीय लोकशाही – नागपूर,श्री साईनाथ प्रकाशन, प्रक्रिया
4. जाधव तुकाराम महेश , भारतीय राजकारणाची रूपरेषा ,शिरपूरकर २ खंड,प्रकाशन द युनिक अकॅडमी पुणे
5. साधना
6. प्रतियोगिता दर्पण